वाचा:-१) महाराष्ट्र शासनाच्या महसुल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमाक:लोआप्र २००९/प्र.क्र.२३८/ल-६ मंत्रालय,मुंबई दिनांक १७ मार्च २०१२

२) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख ( महाराष्ट्र राज्य ),पुणे यांचेकडील परिपत्रक रा.भू.अ.आ.का.-४/युनिकोड रुपांतर /प्र.क्र.१५/१२ दिनांक १५/०३/२०१३

---

क्र./रा.भू.अ.आ.का.४/गाव न. नं १ क/ प्र.क्र. ३८ /२०१३

जमाबंदी आयुक्त आणि संचालक

भूमि अभिलेख ( महाराष्ट्र राज्य ),पुणे

यांचे कार्यालय ,पुणे.

दिनांक -२८/११/२०१३

## परिपत्रक

**विषय :- सुधारीत गाव नमुना नं.१ (क) मध्ये डाटा एन्ट्री करणेबाबत.**

ई-महाभूमि तथा राष्ट्रीय भुमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम अंतर्गत तलाठी दप्तराचे संगणकीकरण करण्यासाठी ई-चावडी आज्ञावली विकसीत करण्यात आली आहे. या आज्ञावलीमध्ये तलाठी गाव दप्तरात संधारण करीत असलेल्या गाव नमुना १ ते २१ चे संगणकीकरण करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महसुल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमाक:लोआप्र २००९/प्र.क्र.२३८/ल-६ मंत्रालय,मुंबई दिनांक १७ मार्च २०१२ नुसार सुधारीत गाव नमुना नं.१ (क) संधारण करण्याबाबत सविस्तर सुचना दिलेल्या आहेत.

सद्यस्थितीत ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावलींच्या अंमलबजावणीसाठी LMIS मधील ७/१२ चा संगणकीकृत डाटा युनिकोडमध्ये रुपांतरीत करणे , डाटा दुरुस्ती आज्ञावलीचा वापर करुन ७/१२ चा युनिकोड रुपांतरीत संगणकीकृत डाटा दुरुस्त करणे, अद्यावत करणे, व्हेरीफीकेशन व व्हॅलीडेशन करणे, प्रमाणित करणे,डाटा स्टेट डाटा सेंटरवर अपलोड करणे व डिजिटली साईन करणे इत्यादी कार्यवाही जिल्हा व तहसिल स्तरावर करण्यात येत आहे.शासनास शासकीय जमिनी,निर्बंधीत सत्ता प्रकाराच्या जमिनी तसेच महसूलाच्या अद्यावत माहितीची वरचेवर आवश्यकता असते.तसेच ई-फेरफार प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी ई-फेरफार आज्ञावलीचा सर्व्हर व नोंदणी विभागाचा आय-सरिता आज्ञावलीचा सर्व्हर यांचे लिंकेज प्रस्थापीत करण्यात येणार आहे.त्याव्दारे शासकीय जमिनी,निर्बंधीत सत्ता प्रकाराच्या जमिनीबाबतचा अलर्ट दस्त नोंदणीवेळी दुय्यम निबंधक यांना आज्ञावलीव्दारे देण्यात येणार आहे. याबाबींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सुधारीत गाव नमुना १ क

मध्ये आज्ञावलीव्दारे डाटा एन्ट्री करणे आवश्यक आहे.

पिक पहाणी आदयावत करण्यासाठी लागणारी आज्ञावली व सुधारीत गाव नमुना १ क मध्ये डेटा करेक्शन युटीलीटी आज्ञावलीव्दारे डाटा एन्ट्री करण्यासाठी आवश्यक आज्ञावली विकसित करुन तांत्रिक संचालक राष्ट्रीय भुमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम,जमाबंदी आयुक्त कार्यालय पुणे यांचेकडील दिनांक २८/११ /२०१३ च्या ई-मेल संदेशाने सर्व जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट यांनी जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी यांचे मदतीने सदरची आज्ञावली सर्व तहसिलदार कार्यालयास पुरवावी.सर्व तहसिलदार यांनी ७/१२ चा युनिकोड रुपांतरीत संगणकीकृत डाटा दुरुस्त करुन अद्यावत केल्यानंतर पुरविण्यात आलेल्या आज्ञावलीचा वापर करुन गावनिहाय सुधारीत गाव नमुना नं १ क तयार करावा, आवश्यतेनुसार त्यामध्ये डाटा एन्ट्रीची कार्यवाही करावी.त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा. सर्व जिल्हाधिकारी यांनी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख, पुणे कार्यालयास पुर्तता अहवाल सादर करावा.

**( चंद्रकांत दळवी )**
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**
**भूमि अभिलेख (म.राज्य.) पुणे**

प्रत : अप्पर मुख्य सचिव महसुल, महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई, यांना माहितीसाठी.

प्रत : विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : राज्य सुचना विज्ञान अधिकारी, मुंबई यांना माहितीसाठी.

प्रत : उपसंचालक भुमि अभिलेख,संलग्न जमाबंदी आयुक्त (सर्वसाधारण, भूमापन,नागरी भूमापन, एकत्रीकरण, रा.भु.अ.आ.का)पुणे यांना माहिती साठी.

प्रत : उपसंचालक भुमि अभिलेख (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : वरीष्ठ तांत्रिक संचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांना माहिती व कार्यवाहीसाठी .

प्रत : जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : जिल्हा अधीक्षक भुमि अभिलेख (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत: डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत : उपविभागीय अधिकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत: जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी (सर्व ) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत : तहसिलदार (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.